क्रमांक : २०५८६ / ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८ डिसेंबर, २०२१

# :: परिपत्रक ::

**विषय :- महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२१ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील दिनांक १४ ते १७ डिसेंबर, २०२१ रोजीचे तारांकित प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आल्याबाबत**

**संदर्भ :- १) या सचिवालयाचे परिपत्रक क्र. १५८७५/ब कक्ष, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१**
**२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र. १८३८५/ब कक्ष, दिनांक २ डिसेंबर, २०२१**

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, विधानसभा कामकाज सल्लागार समितीची सोमवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत सन २०२१ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात खालीलप्रमाणे प्रश्नोत्तरे घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला :-

| अ.क्र. | गट | उत्तराचा दिनांक | सुधारित उत्तराचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | दोन | मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१ | मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ |
| २. | तीन | बुधवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२१ | बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ |
| ३. | चार | गुरुवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२१ | गुरुवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२१ |
| ४. | पाच | शुक्रवार, दिनांक १० डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२१ |
| ५. | एक | सोमवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२१ | सोमवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२१ |

त्यानुसार बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ ते मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील तारांकित स्वीकृत प्रश्न उक्त दिनांकाप्रमाणे प्रश्नोत्तराच्या यादीत समाविष्ट करण्यात आले.

तथापि, सोमवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी विधानसभा सभागृहात मंगळवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२१ ते शुक्रवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजी कार्यवाहीत घेतलेले प्रश्न अतारांकित करण्याबाबत उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार या अधिवेशनाकरीता तारांकित स्वीकृत

..२/-

करुन विभागाकडे पाठविण्यात आलेले प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. या अतारांकित प्रश्नांची उ म.वि.स. नियम ७२(२) अन्वये सदरहू परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत या सचिवालयास पाठविण्यात यावीत. तसेच वस्तुस्थितीचे प्रश्न मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे मान्यतेने अतारांकित स्वीकृत करुन विभाग पाठविण्यात येतील त्या प्रश्नांची उत्तरे विभागास प्रश्न प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत पाठविण्या यावीत.

(विलास आठवले)
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२) मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाही अग्रेषित.